पुढारी

# विद्यार्थ्यांकडून सामाजिक प्रबोधन, एकात्मतेचे दर्शन

## विद्यापीठात राष्ट्रीय एकात्मता शिबिर; कलाविष्काराचे सादरीकरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सामाजिक विषयांवर वक्तृत्व स्पर्धेतून प्रबोधन, पारंपरिक नृत्यांमधून विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडविले.

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. देशभरातील २२ विद्यापीठांमधील सुमारे २१० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले आहेत. शिबिरात अधिसभा सदस्य प्रा. मधुकर पाटील यांचे 'युवा नेतृत्व', दिग्दर्शक अनुप जत्राटकर यांनी 'फिल्म क्रिएशन अँड करिअर' विषयावर विद्यार्थांना मार्गदर्शन केले.




**कोल्हापूर : राष्ट्रीय एकात्मता शिबिरात पारंपरिक नृत्य सादर करताना राज्यस्थान विद्यापीठाचे विद्यार्थी. (छाया : नाज ट्रेनर)**

सायंकाळी प्रा. डॉ. नवनाथ शिंदे यांनी 'शहीद भगतसिंग' हा एकपात्री प्रयोग सादर केला. यावेळी 'एनएसएस'चे पुणे विभागाचे संचालक डॉ. कार्तिकेय, प्रा. डॉ. डी. के. गायकवाड, प्राचार्य डी. डी. कुरपळकर, डॉ. पी. टी.गायकवाड आदी उपस्थित होते.

18 DEC 2018 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विविध राज्यातील लोकगीतांनी साधली एकात्मता

## शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय एकात्मता शिबिरात ५ संघांकडून लोकगीते सादर

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात गेल्या तीन दिवसापासून राष्ट्रीय एकात्मता शिबिर सुरू आहे. तिसऱ्या दिवशी ५ राज्यातील संघानी आपआपल्या राज्याचे लोकगीते सादर करीत उपस्थितांची मने जिंकली.तसेच या पाच राज्यातील संघांनी सादर केलेल्या लोकगीतांच्या तालावर तरूणाई थिरकली. त्या लोकगीतांना व लोकनृत्यांना प्रेक्षकांनीही टाळ्यांच्या कडकडाटात व शिट्ट्या वाजवून दाद दिली.

भाषा भवन येथे सुरू असलेल्या स्पर्धेत तामिळनाडू, केरळ, गोवा, औरंगाबाद, राज्यांनी आपल्या कला सादर केल्या. तसेच प्रा. नवनाथ शिंदे यांनी शहीद भगतसिंग या विषयावर एकपात्री प्रयोग सादर केला. सर्वच राज्यांनी आपआपल्या लोकनृत्य व लोकगीतांचे सादरीकरण करून सांस्कृतिक विचारांची देवाण घेवाण करीत भारतीय एकात्मतेचा संदेश दिला. ५ राज्यातील लोकगीतांचे परीक्षकांनीही कौतुक केले. या सांस्कृतिक कार्यक्रमाला विद्यार्थी व पालकांनी गर्दी केली होती. जल्लोषी वातावरणात एकात्मता शिबिर सुरू आहे. २१ डिसेंबरला शिबिराचा समारोप होणार आहे. अनुप जत्राटकर यांनी फिल्म ॲप्रिशिएशन ॲन्ड करिअर या विषयावर मार्गदर्शन करताना चित्रपटात अभिनेता, गायक सोडून चित्रपटात अनेक संधी आहेत, राजा हरिषचंद्र या चित्रपटातील काही क्षण दाखवले, चित्रपट कसे पाहावे याविषयी मार्गदर्शन केले. तर प्रा. मधुकर पाटील यांनी युवा नेतृत्व विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. दरम्यान् पन्हाळा, ज्योतिबा, न्यू पॅलेस या पर्यटन स्थळांना भेटी देत, कोल्हापुरातील ऐतिहासिक दस्तऐवजांची माहिती घेतली.

यावेळी पुणे विभागीय संचालक डी. कार्तिकियन राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजनाचे क्षेत्रीय कार्यालयाचे अधिकारी अजय शिंदे, शिवाजी विद्यापीठ क्रिडा विभाग संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, प्राचार्य डॉ. दिलीप कुरळपकर उपस्थित होते.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय एकात्मता शिबिरात लोकगीत सादर करताना गोव्याचा संघ.**

सकाळ




**कोल्हापूर : राष्ट्रीय एकात्मता शिबिरात रात्री सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपापल्या प्रांतातील लोककला सादर केली.**

# विद्यार्थ्यांना दिले फिल्ममेकिंगचे तंत्र

## राष्ट्रीय एकात्मता शिबिरार्थींना मिळाली कलानगरीची माहिती

**कोल्हापूर, ता. १७ :** राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना आज कलानगरीची ओळख करून दिली. त्याचबरोबर चित्रपट निर्मितीचे तंत्रही शिकवले. चित्रपट हा युवा वर्गाचा जिव्हाळ्याचा विषय असल्याने त्यांनी उत्साहाने या सत्रामध्ये सहभाग घेतला.

केंद्रीय युवा कार्यक्रम व खेल मंत्रालयातर्फे राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे आयोजन केले जाते. यंदा १५ ते २१ डिसेंबर कालावधीमध्ये शिवाजी विद्यापीठात शिबिर झाले. दोन दिवसांपूर्वी सुरू झालेल्या शिबिरामध्ये आज अनुप जत्राटकर यांनी चित्रपट निर्मितीचे तंत्र समजावून सांगितले. प्रथम सत्रात प्रा. मधुकर पाटील यांनी युवानेतृत्व या विषयावर मार्गदर्शन केले. अनुप जत्राटकर यांनी विद्यार्थ्यांना फिल्ममेकिंगचे धडे दिले. कोल्हापुरातील चित्रपटनिर्मितीचा इतिहासही त्यांनी सांगितला. दिग्दर्शक आणि निर्माते असलेल्या अनुप जत्राटकर यांनी विविध माध्यमांतून चित्रपटांची माहिती दिली. चित्रपट म्हणजे काय, तो तयार करण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी केल्या जातात, पडद्यामागे राबणारे हात यांची माहिती दिली, तर काही चित्रपटांचे भाग दाखवत चित्रपट कसा पाहावा, याचेही त्यांनी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांची वादविवाद स्पर्धा घेण्यात आली, तर सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमातून एकात्मतेचे दर्शन घडले.

Kolhapur, Kolhapur-Today
18/12/2018 Page No. 3

लोकमत

## राष्ट्रीय एकात्मता शिबिर : तज्ज्ञांकडून मार्गदर्शन

# विद्यार्थ्यांनी गिरविले चित्रपटनिर्मितीचे धडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोल्हापूर ही चित्रपटसृष्टीची पंढरी, या मातीत घडलेला चित्रपटांचा इतिहास, तो कसा पाहावा आणि कसा तयार करावा, याबाबतचे धडे सोमवारी विद्यार्थ्यांनी गिरविले. राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय कार्यालय, युवा आणि खेल मंत्रालय, भारत सरकार व शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे शिवाजी विद्यापीठ येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबिराच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना ही संधी मिळाली.

शिबिराच्या पहिल्या सत्रात झालेल्या व्याख्यानात युवा नेतृत्व ही परिवर्तनाची नांदी ठरणारी गोष्ट असून, महाविद्यालयीन जीवनात नेतृत्वाचे धडे गिरविण्यासाठी प्रयत्नपूर्वक पाऊल उचलले पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. मधुकर पाटील यांनी केले.




राष्ट्रीय एकात्मता शिबिरात सोमवारी नवनाथ शिंदे यांनी 'शहीद भगतसिंग' या विषयावर एकपात्री प्रयोग सादर केला.

दुसऱ्या सत्रात युवा फिल्म मेकर अनुप जत्राटकर यांनी 'फिल्म अॅप्रिसिएशन अँड करिअर' या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी चित्रपट म्हणजे काय, तो तयार करण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी केल्या जातात, पडद्यामागे राबणारे हात यांची माहिती दिली, तसेच काही चित्रपटांचे भाग दाखवित चित्रपट कसा पाहावा, सिनेमा निर्मितीच्या क्षेत्रातल्या संधी, विषयनिवडीची दृष्टी यावर मार्गदर्शन केले.

दुपारच्या सत्रात झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय एकात्मता, डिजिटल इंडिया, महिला सबलीकरण आणि लिंग समानता या विषयावर मत मांडले. सायंकाळी डॉ. नवनाथ शिंदे यांनी 'शहीद भगतसिंग' या विषयावर एकपात्री प्रयोग सादर केला.

18 DEC 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एनएसएस स्वयंसेवकांना फिल्म मेकिंगचे धडे

## चित्रपंढरीचा वारसा पाहून विद्यार्थी थक्क

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी ११ राज्यांतून शिवाजी विद्यापीठामध्ये आलेल्या स्वयंसेवकांनी सोमवारी फिल्म मेकिंगचे धडे गिरवले. चित्रपटाचा इतिहास, चित्रपट म्हणजे काय, यापासून तो कसा पाहावा आणि कसा तयार करावा, याची माहिती अनुप जत्राटकर यांनी या स्वयंसेवकांना दिली. अगदी कमी वेळेत उपयुक्त माहिती मिळाल्याने विद्यार्थीही भारावून गेले.

राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय कार्यालय, युवा आणि खेल मंत्रालय, भारत सरकार व शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठामध्ये दि. १५ पासून राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरामध्ये देशभरातील ११ राज्यांतील संघ सहभागी झाले आहेत. रविवारच्या भरगच्च कार्यक्रमांनंतर सोमवारच्या कार्यक्रमांविषयी देशभरातून आलेल्या विद्यार्थ्यांना उत्सुकता होती. सोमवारी सकाळची सुरुवात प्रा. मधुकर पाटील यांनी दिलेल्या 'युवा नेतृत्व' या विषयावरील व्याख्यानाने झाली, तर त्यानंतर अनुप जत्राटकर यांनी विद्यार्थ्यांना फिल्म मेकिंगचे धडे दिले. कोल्हापूर हे मराठी चित्रपटांचे माहेरघर आहे, याची माहिती या विद्यार्थ्यांना आधीपासून असल्याने त्यांना या कार्यशाळेची मोठी उत्सुकता होती.

दिग्दर्शक आणि निर्माते असलेल्या अनुप जत्राटकर यांनी विविध माध्यमांतून चित्रपटांची माहिती देण्यास सुरुवात केली. यावेळी चित्रपट म्हणजे काय, तो तयार करण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी केल्या जातात, पडद्यामागे राबणारे हात यांची माहिती दिली, तर काही चित्रपटांचे भाग दाखवत चित्रपट कसा पाहावा, याचेही त्यांनी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांची वादविवाद स्पर्धा घेण्यात आली, तर सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमातून एकात्मतेचे दर्शन घडले.







**भारत सरकारच्या क्रीडा आणि युवककल्याण मंत्रालय, राष्ट्रीय सेवा योजना संचलानय आणि शिवाजी विद्यापीठाच्यावतीने राष्ट्रीय सेवा योजनेच्या कॅम्पच्या माध्यमांतून विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन शिवाजी विद्यापीठामध्ये करण्यात आले. यासाठी देशभरातील विविध विद्यापीठांतून स्वयंसेवक विद्यापीठात आले आहे. तरुणाईची उर्जा, प्रचंड उत्साह आणि त्यातून राष्ट्रीय एकात्मतेची बीजे रोवली जात आहेत.**

**अर्जुन गोडगे, महेश कांबळे**
सीसीआर, शिवाजी विद्यापीठ



राष्ट्रीय सेवा योजना हे युवाशक्ती व व्यक्तिमत्व विकासासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे हक्काचे म्हणून ओळखले जाते. यामध्ये साक्षरतेसंबंधीची कार्ये, पर्यावरण सुरक्षा, आरोग्य, आत्पकालीन सेवा सुविधेबद्दलची माहिती, जलव्यवस्थापन, समाजातील घटनांचे थेट प्रतिबिंब राष्ट्रीय सेवा योजनेच्या कॅम्पमध्ये पहावयास मिळते. शैक्षणिक वर्षामध्ये राष्ट्रीय सेवा योजना संचालनालयांकडून वर्षभरामध्ये अकरा कॅम्प राबिवले जातात. त्यामधील महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांसाठी शिवाजी विद्यापीठ आयोजकाची भूमिका पार पाडत आहे.

या कॅम्पमध्ये देशाच्या विविध भागातून विद्यापीठांचे विद्यार्थी, संघचालक, यांच्या उपस्थितीमुळे विद्यापीठाचा कॅम्पस् बहुरंगी बनला आहे. महाविद्यालमध्ये शिक्षण घेत असताना समाजसेवा करणे, आपल्या जवळच्या परिसरातील लोकांमध्ये मिसळून रचनात्मक कामे करणे, समाजसेवेच्या माध्यमांतून स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय सेवा, स्वावलंबन, चारित्र्यसंवर्धन व सामाजिक बांधिलकी या मूल्यांचा समन्वय नवीन शिक्षण पद्धतीमध्ये घडवून आणणे या नितिमूल्यांवर आधारित या कॅम्पना विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग असतो. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, विचारांची देवाण-घेवाण आणि भाषेचा परिचय राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमांतून बलशाली भारताचे स्वप्न साकारण्याकरीता राष्ट्रीय सेवा योजनेची ही शिबिरे महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

या शिबिरांमधून नेतृत्वगुण विकास, नियोजन सत्र, आरोग्य तपासणी, स्वच्छता अभियान, राष्ट्रीय सद्भावना दिवस, मतदार जनजागृती, व्यसनविरोधी अभियान, रस्ते सुरक्षा सप्ताह, महिला सबलीकरण, स्त्री-पुरूष समानता आदी विषयांवर व्याख्याने तसेच डिबेट च्या माध्यमांतून तरुणाईला व्यक्त होण्याचे माध्यम उपलब्ध करून दिले जाते.



राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर यावर्षी आयोजित करण्याचा मान शिवाजी विद्यापीठाला मिळाला ही अभिमानाची गोष्ट आहे. या शिबिराच्या माध्यमांतून तरुणाईमध्ये राष्ट्रीय एकात्मता, भारतीय संस्कृतीमधील वैविध्य, राष्ट्रीय एकता ही मूल्ये रुजली जाण्यासाठी मदत होईल व ही मूल्ये म्हणजेच भारताची खरी ताकद आहे. नवपिढीचा या शिबिराला चांगला प्रतिसाद मिळत आहे. राष्ट्रीय सेवा योजना भारताचा सांस्कृतिक वारसा जपण्याचे कार्य करत आहे.

**डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू**

तरुणांमध्ये राष्ट्राबद्दल एकात्मता निर्माण व्हावी, महाविद्यालयीन तरुणांचे विविध पैलू, क्षमता या गुणांना या शिबिरांमधून प्रोत्साहन मिळते. तरुणाईमधील उर्जा हीच तरुणांची खरी ताकद आहे. आपल्या क्षमतांचा, व्यक्तिमत्वा विकासाचा पाया राष्ट्रीय सेवा योजनेमधून महात्मा गांधीच्या स्पप्नातील भारत घडविण्यासाठी उपयोगी ठरणारी आहे.

– **डी. कार्तिकेयन,**
क्षेत्रीय संचालक, राष्ट्रीय सेवा योजना



स्त्री-पुरूष समानता, आपत्कालीन परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी करावी लागणारी प्रात्यक्षिके यांचे प्रशिक्षण आणि राष्ट्रीय एकात्मता ठिकवण्यासाठी ही मूल्ये आवश्यक आहेत. समाजातील विविध प्रश्नांवर आधारित पथनाट्य, कला, सांस्कृतिक कार्यक्रम यांचे आयोजन केले जाते. या उपक्रमांना विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळतो.

– **डी. के. गायकवाड,**
समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना.



हे कॅम्प म्हणजे राष्ट्राचे एकीकरण. मला यामध्ये खूप काही शिकायला मिळालं. मी या शिबिरात पहिल्यांदाच सामील झाले, मला इथं खूप काही शिकायला मिळालं. कोल्हापुरी पांढरा तांबडा तसेच आम्हाला कोल्हापूरच्या संस्कृती तसेच विविध राज्यातील संस्कृती अनुभवायला मिळाली.

– **गंगा शर्मा**, एस,
जैन सुबोध विद्यापीठ, राजस्थान



व्यक्तिमत्व विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमांतून विविध सामाजिक समस्या मांडण्यासाठी व्यासपीठ मिळते. या शिबिरांच्या माध्यमांतून सांस्कृतिक देवाण-घेवाण, संभाषण कौशल्ये, शेतकऱ्यांच्या आत्महत्या या सामाजिक विषयांवर पथनाट्याच्या माध्यमांतून अंगी असणारी कला सादर करण्याची संधी मिळाली. भविष्यामध्ये समाजसेवेचा वारसा जपण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

– **विकास नागरपोळे,**
शहाजी कॉलेज, कोल्हापूर



या कॅम्पमुळे संपुर्ण भारतभर भ्रमण करण्याची संधी मिळाली. दोन वर्षापासून वेगवेगळ्या शिबिरांमध्ये सहभागी होत आहे. कोल्हापूर ही महाराष्ट्राची ऐतिहासिक राजधानी मानली जाते, येथील विविध सांस्कृतिक वारस पाहण्याची संधी या कॅम्पमुळे मिळाली. 'आव्हान'या शिबिरामध्ये अदिवासी नृत्य, आणि समस्या जवळून पाहता आल्या. यामधुन बरेच काही शिकता आले.

– **हर्षला सूर्यवंशी**, कवियित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव



दोनवर्षांपासून राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरांमध्ये सहभागी होत आहे. आजपर्यंत चार शिबिरे केली आहेत. या शिबिरामधून राष्ट्रीय संचालनामध्ये सहभागी होण्याचा माझा मानस आहे. त्यासाठी या शिबिरामध्ये मी कठोर परिश्रम घेत आहे. कोल्हापूरच्या शिबिराचा भविष्यात खूपच उपयोग होणार आहे.

– **अंजली दीक्षित,**
एस.एस जैन कॉलेज, राजस्थान विद्यापीठ.



एन. एन. एस. कॅंपच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठामध्ये आलो. शिवाजी महाराजांच्याबद्दल ऐकूण होतो. महापराक्रमी, विशेष व्यवस्थापन कौशल्य असलेले, अत्यंत धाडसी, युद्ध कौशल्य निपून, दूरदृष्टी असलेल्या शिवाजी महाराजांच्या यांच्या नावाने सुरू असलेल्या विद्यापीठात आल्याबद्दल छान वाटले.

– **प्रिया टेंगसे**, गोवा विद्यापीठ.



राष्ट्रीय सेवा योजना शिबिरांला तरुणाईचा उत्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या शिबिरामधून युवकांना समाजसेवा करण्याची संधी मिळत आहे. कोल्हापूरचा सांस्कृतिक वारसा जतन करण्याची जबाबदारी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकांवर आहे ती जबाबदारी ते नक्कीच पेलतील इतकी क्षमता विकसित केली जाणार आहे.

– **अरुण बालकृष्णणन्,**
कालिकत विद्यापीठ, केरळ.



या शिबिरांमधून पाणी आडवा, पाणी जिरवा, दुष्काळसदृश्य परिस्थितीवर मात करण्यासाठी जलसंवर्धन, छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्यांचे संवर्धन असे विधायक कार्यक्रम हाती घेवून तरुणांची उर्जा या कामासाठी लावण्यासाठी या अशा शिबिरांचा खूप उपयोग होत आहे.

– **रवींद्र मोरे,**
सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे



खऱ्या अर्थानं राष्ट्रीय एकता आणि एकात्मता यांचं दर्शन कुठं होत असेल तर राष्ट्रीय एकीकरण शिबिर. मॅनेजमेंट सदस्य म्हणून मला काम करताना तिन्ही भाषांमधून बाहेरील राज्यातील विद्यापीठाशी संपर्क साधण्याची संधी मिळाली,आणि आमच्या मध्ये एक अतूट नातं निर्माण झालं. एकसंध भारत नेमका कसा असतो याचा प्रत्यय या शिबिरात मला आला.

– **अनिकेत कांबळे,**
शिवाजी विद्यापीठ



मला या शिबिरात सहभागी होताना खूप आनंद झाला. मला इथं राष्ट्रीय एकात्मतेच दर्शन झालं,त्याप्रमाणे आम्हाला कोल्हापूरची संस्कृती कळाली, पन्हाळा किल्ल्याचा इतिहास आणि अंबाबाई मंदिर यांना छोटीशी भेट देण्यात आली. कोल्हापूर म्हणजे कलेचं माहेरघर म्हंटल तर वावगं ठरणार नाही.

– **सत्रजित विजयराम,**
अण्णामलाई विद्यापीठ, तामिळनाडू.

महाराष्ट्र तसेच देशाच्या कानाकोपऱ्यातून इथं स्वयंसेवक आले आहेत. आम्हाला इथं अस्सल कोल्हापुरी संस्कृती पाहायला मिळाली. मला या शिबिरात सहभागी होऊन खूप आनंद झाला. अजूनही कोल्हापूरने ग्रामीण संस्कृती जपून नवीन विचारधारा विद्यार्थ्यांच्या मनामध्ये रुजवली जाते.

– **वैभव पाटील**, डॉ.बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

हा माझा पाहिलाच कॅम्प असल्याने मनावर दडपण होते. आपल्या अंगी असणार्या कौशल्याचा विकास करण्यासाठी अशा शिबिराची गरज असते. तरुणाईमध्ये राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागण्यासाठी करण्यात येणारे प्रयत्न, विविध भाषा, संस्कृती यांचा वसा आणि वारसा जपण्याची जबाबदारी आजच्या नव्या पिढीवर आहे.

– **ऐश्वर्या मोरे**, विवेकांनद महाविद्यालय

१३ विद्यापीठातील २०० विद्यार्थी-विद्यार्थीनीची विचारांची देवाणघेवाण या शिबिराच्या माध्यमातून होत आहे. भाषा, पेहराव, विचार तरुण तरुणीमध्ये दिसून येत आहे. विभिन्नतेतून एकता पहावयास मिळत आहे. या शिबिरातून राष्ट्रीय सेवा वाढीस लागत आहे.

– **तमाम मुबारीश**, पाँडेचरी विद्यापीठ.

■ **संकलन : अक्षय देसाई, जास्वंदी व्हनखंडे**